# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:02.06.2026** **वार:मंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि म्यानमाचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आँग ह्लाइंग यांच्यात नवी दिल्लीत चर्चा; भारतविरोधी कारवायांसाठी म्यानमाची भूमी वापरू देणार नाही, मान्यमाच्या अध्यक्षांची ग्वाही
2. भारत अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारातील बहुतांश मुद्दे निश्चित झाल्याची केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांची माहिती
3. आशिया चषक हॉकी स्पर्धेत पुरुषांच्या 18 वर्षांखालील गटात भारताची कोरियावर 4-1 अशी दणदणीत मात आणि
4. महाराष्ट्र गोव्यासह अनेक राज्यांमध्ये आज पावसाचा अंदाज

**भारत-म्यानमा**

भारत आणि म्यानमा दरम्यान द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि म्यानमाचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आँग ह्लाइंग यांच्यात काल नवी दिल्ली इथं बैठक झाली. व्यापार, संरक्षण, सीमा व्यवस्थापन, संस्कृती आणि इतर परस्पर हिताच्या क्षेत्रांचा यात समावेश होता. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी चर्चेनंतर प्रसारमाध्यमांना याबाबत माहिती दिली. म्यानमाच्या सार्वभौमत्वासाठी आणि प्रादेशिक अखंडतेसाठी भारताचा पाठिंबा असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केलं. तर भारतविरोधी कारवायांसाठी म्यानमाची भूमी वापरू दिली जाणार नाही अशी हमी म्यानमांच्या अध्यक्षांनी दिली. दुर्मीळ खनिज पुरवठ्याच्या मुद्द्यावरही दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली, असं विक्रम मिस्त्री यांनी सांगितलं.

'कलादान मल्टी-मोडल ट्रान्झिट ट्रान्सपोर्ट प्रकल्पा'चं काम शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याच्या दिशेने काम करण्यासही दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली, असंही मिस्त्री यांनी सांगितलं.

**राष्ट्रपती**

भारताच्या 'शेजारी प्रथम', 'अ‍ॅक्ट ईस्ट' आणि 'महासागर' या धोरणांमध्ये म्यानमार हा एक महत्त्वाचा भागीदार आहे. असं राष्ट्रापती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले आहे. काल राष्ट्रपती भवनात म्यानमारचे राष्ट्राध्यक्षांचं स्वागत करताना बोलत होत्या. म्यानमारच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्याबद्दल ह्लाइंग यांचं अभिनंदन मुर्मू यांनी अभिनंदन केलं.

म्यानमाचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आँग ह्लाइंग यांच्यासमवेत काही कॅबिनेट मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि उद्योगपतींचा समावेश असलेलं एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ सध्या भारताच्या दौऱ्यावर आहे. व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींशी संवाद साधण्यासाठी ते सर्वजण आज मुंबईला भेट देणार आहेत.

**पियुष-गोयल**

'भारत-ओमान सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार' कालपासून अंमलात आला आहे. अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल नवी दिल्ली इथं प्रसार माध्यमांना दिली. सहा महिन्यांपूर्वी या करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे, CEPA हा केवळ एक व्यापारी करार नाही; तर तो दोन संस्कृतींमधील विश्वासाचे प्रतीक आहे. या सर्वसमावेशक करारामुळे भारत आणि ओमान यांच्यातील संबंधांना नवी गती मिळेल, असा विश्वास गोयल यांनी सांगितलं. या कराराच्या पहिल्या दिवसापासूनच भारत ओमानच्या 98 टक्के उत्पादनावर कोणत्याही प्रकारे शुल्क लावणार नाही. असंही त्यांनी सांगितलं.

**अमेरिका-भारत**

भारत आणि अमेरिकेने द्विपक्षीय व्यापार कराराच्या बहुतांश बाबी निश्चित केल्या आहेत. पहिला टप्पा अंतिम करण्यासाठी चर्चा करण्याकरता अमेरिकेचे शिष्टमंडळ सध्या नवी दिल्लीत उपस्थित आहे. ही चर्चा आजपासून येत्या 4 जून या कालावधीत होत आहे. अशी माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल दिली. वाणिज्य विभागातील अतिरिक्त सचिव दर्पण जैन भारताची भुमिका मांडत आहेत, तर अमेरिकेच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व ब्रेंडन लिंच करत आहेत. गेल्या 3 फेब्रुवारी रोजी, दोन्ही बाजूंनी याकराराच्या पहिल्या टप्प्याची रूपरेषा जाहीर केली होती.

**भारत-ऑस्ट्रेलिया**

भारत-ऑस्ट्रेलिया संरक्षण मंत्र्यांच्या संवादाची दुसरी फेरी काल नवी दिल्लीत पार पडली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि ऑस्ट्रेलियाचे उपपंतप्रधान आणि संरक्षण मंत्री रिचर्ड मार्लेस यांच्यादरम्यान काल बैठक झाली. मुक्त, शांततापूर्ण, स्थिर आणि समृद्ध हिंद प्रशांत क्षेत्रासाठी प्रादेशिक भागीदारांशी सहकार्य वाढवण्यावर या चर्चेत भर देण्यात आला. दोन्ही देशांनी तंत्रज्ञान, तसंच संरक्षण क्षेत्रातील औद्योगिक सहकार्य वाढवण्यावर सहमती दर्शवली.

**राज्यसभा निवडणूक**

राज्यसभेच्या 24 जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीची अधिसूचना काल जारी करण्यात आली. कालपासून येत्या 8 जूनपर्यंत या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आहे. 18 जूनला मतदान आणि त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. या 24 जागांमध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेचाही समावेश आहे.

**विधानपरिषद निवडणूक**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या 17 जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. जवळपास सर्वच पक्षांमध्ये बंडखोरी झाल्यानं गुरुवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर निवडणुकीचं चित्र स्पष्ट होईल.

**ट्रंप**

इस्त्रायल आणि लेबनॉनमधील हिजबुल्लाह यांनी संघर्ष कमी करण्यास सहमती दर्शवली असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे सांगितलं. ट्रम्प यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी चर्चा केली तसंच लेबनॉनमधील दहशतवादी गटाशीही मध्यस्थांच्या माध्यमातून संवाद साधला, त्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**मुख्यमंत्री इबस**

विकसित महाराष्ट्र अंतर्गत 2047 पर्यंत एसटीचा 100 टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरित करायचा आहे. या अनुषंगानं बसेससाठी आवश्यक असलेली चार्जिंग स्टेशन्स उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इ-बसेससंदर्भात बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक या बैठकीत दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

**सर्वोच्च न्यायालय**

सर्वोच्च न्यायालयाच्या पाच नवनियुक्त न्यायाधीशांचा शपथविधी आज होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत या न्यायाधीशांना पदाची शपथ देतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सरन्यायाधीशांसमवेत विचारविनिमय करून पाच नवीन न्यायाधीशांची सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती केली आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती शील नागू, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती संजीव सचदेवा आणि जम्मू आणि काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती अरुण पल्ली यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आहे. ज्येष्ठ वकील व्यंकिता सुब्रमणी मोहना यांचीही सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**भाजपा**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी काल नवी दिल्लीत पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या 12 वर्षांच्या कार्यकाळावर, संघटनात्मक विस्तारावर आणि भविष्यातील उपक्रमांवर या बैठकीत चर्चा झाली, असं खासदार आणि पक्षाचे प्रवक्ते डॉ. संबित पात्रा यांनी वार्ताहरांना सांगितलं.

**CBSE**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच CBSEनं विद्यार्थ्यांसाठी गुणांची पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठीचं पोर्टल सुरू केलं आहे. मंडळाने समाज माध्यमावरील एका पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. गुणांची पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज कसा करावा, याच्या सविस्तर सूचनांसाठी विद्यार्थ्यांनी व्हिडिओ काळजीपूर्वक पाहावा, असा सल्ला CBSE ने दिला आहे. येत्या 6 जूनपर्यंत यासाठी अर्ज करता येणार आहे.

**उत्तराखंड**

उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात, युनेस्को जागतिक वारसा स्थळ असलेल्या 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'; पर्यटकांसाठी खुली करण्यात आली आहे. या खोऱ्यातील समृद्ध जैवविविधता आणि दुर्मिळ वनस्पती प्रजातींच्या संवर्धनामध्ये सहकार्य करण्याचे आवाहन वन विभागाने पर्यटकांना केले आहे.

**हॉकी**

जपानमधील काकामिगहारा इथं सुरू असलेल्या पुरुषांच्या 18 वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेतील 'गट अ' मधील तिसऱ्या सामन्यात, भारतीय हॉकीपटूंनी काल कोरियावर 4-1 असा दणदणीत विजय मिळवला. कर्णधार केतन कुशवाहने दोन गोल केले तर 54व्या मिनिटाला शाहरुख अलीने गोल करत विजय निश्चित केला. या विजयासह, 'गट अ' मध्ये भारत सहा गुणांसह कोरिया आणि जपान यांच्या बरोबरीने पोहोचला आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. भारत आपला गटातील अखेरचा सामना उद्या चायनीज तैपेईविरुद्ध खेळेल.

**हवामान**

कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि पुदुचेरीसह अन्य काही राज्यांमध्ये काही ठिकाणी आज मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. दिल्ली, हरियाणा, उत्तराखंड, उत्तर प्रदेशसह अन्य काही राज्यांमध्येही विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यासाह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्र गोव्यासह गुजरातमध्येही पावसाचा अंदाज आहे. तर इशान्येकडील राज्यांमध्ये उष्ण आणि दमट हवामान राहील असं हवामान विभागान म्हटलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.